इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, काढता येणारी मेमरी, पॉवर पॅक (बॅटरी) इत्यादी साहित्याची जडवस्तु संग्रह नोंदवही ठेवणेबाबत

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र. ७ /का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ५ जुलै, २००७.

आ दे श

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात झालेल्या लेखा परिक्षणामध्ये लेखा परिक्षकांनी जिल्हा पातळीवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, काढता येणारी मेमरी, पॉवर पॅक (बॅटरी) इत्यादी साहित्याची जडवस्तु संग्रह नोंदवही ठेवणेबाबत सूचना दिल्या आहेत. त्यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, राज्य निवडणूक आयोगाने खरेदी केलेल्या व आपल्या ताब्यात असलेल्या उपरोक्त साहित्याची नोंद एका स्वतंत्र जडवस्तु संग्रह नोंदवहीमध्ये ठेवावी. दरवर्षी दिनांक- ३१ मार्च रोजी आपल्या ताब्यात असलेल्या उपरोक्त साहित्याचा हिशोब व सदर साहित्य सुस्थितीत ठेवले असल्याचे प्रमाणपत्र राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात कृपया पाठवावे.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

र. भि. नातु

( रचना नातु )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
१) सर्व महानगरपालिका आयुक्त,
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
५) निवड नस्ती (कार्या-५)